# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** शासन निर्णय क्र. नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६,
**{सार्व.आरो.अभि. विभाग }** दि. ०१.०४.२००९ व शासन निर्णय क्रमांक नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६ दिनांक ०८.०९.२०१० अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमश: नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी २००९ व दुरूस्ती उपविधी २०१० च्या कलम ५६(ब) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी वर्ष २०२३ - २४ करिता सद्यस्थित प्रचलित दरात ५% वाढ करण्यास दि. २७.०३.२०२३ अन्वये मंजुरी प्रदान केलेल्या व दिनांक ०१.०४.२०२३ पासून लागू केलेल्या सुधारित दरांची माहीती मा. प्रशासक यांचेकडे ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-

१. शासन निर्णय क्र. नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६, दि. ०१.०४.२००९ व शासन निर्णय क्रमांक नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६ दिनांक ०८.०९.२०१० अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमश: नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी कलम ५६(ब) मधील तरतुदीनुसार आयुक्त, म.न.पा. यांना प्रत्येक वित्त वर्षात पाच टक्के पर्यंत पाणीपट्टी दर सुधारित करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. आयुक्तांना प्राप्त अधिकारांतर्गत वित्त वर्ष २०११ - १२ करीता आदेश क्र. एम.सी./१३७/२०११ दि.१२.०८.२०११ अन्वये, वित्त वर्ष २०१२ - १३ करीता आदेश क्र. एम.सी./२०६, दिनांक ३१.०३.२०१२ अन्वये, वित्त वर्ष २०१३ - १४ करीता आदेश क्र. एम.सी./१९७/२०१३, दि. ०८.०५.२०१३ अन्वये, वित्त वर्ष २०१४ - १५ करीता आदेश क्र. एम.सी./५१५/२०१४, दि.०१.०४.२०१४ अन्वये, वित्तवर्ष २०१५ - १६ करीता आदेश क्र. एम.सी./६६/२०१५, दि.१०.०४.२०१५ अन्वये, वित्त वर्ष २०१६-१७ करीता आदेश क्र. एम.सी./३५५/२०१६, दि.०२.०४.२०१६ अन्वये, वित्तवर्ष २०१७-१८ करीता आदेश क्र. एम.सी./५६२/२०१७, दि.३०.०३.२०१७ अन्वये, वित्त वर्ष २०१८-१९ करीता आदेश क्रमांक WW/१२२/MC दि.२०.०४.२०१८ अन्वये, वित्त वर्ष २०१९-२० करीता आदेश क्रमांक WW/EE/२०८/१९/MC दि.२५.०४.२०१९अन्वये व वित्त वर्ष २०२०-२१ करीता दि. ११.०३.२०२० चे आदेशान्वये पाणीपट्टी दरात वाढ करण्यात आली होती. त्याचप्रमाणे वित्त वर्ष २०२१-२२ करिता सद्य प्रचलित दरात ५% वाढ करून दि. ०१.०४.२०२१ पासून लागू करण्यास्तव मा. आयुक्त यांनी दि. २९.०४.२०२१ च्या आदेशान्वये मंजुरी प्रदान केली होती. परंतु मा. आयुक्त यांनी महामारीमुळे दि. २८.०५.२०२१ चे आदेशान्वये वर्ष २०२१-२२ करीता दरवाढीस स्थगीती दिली व वित्त वर्ष २०२२-२३ करीता दिनांक २८.०२.२०२२ चे आदेशान्वये पाणीपट्टी दरात वाढ करण्यात आली होती. त्याचप्रमाणे वित्त वर्ष २०२३-२४ करिता सद्य प्रचलीत दरात ५% वाढ करून दि. ०१.०४.२०२३ पासून लागू करण्यास्तव मा.आयुक्त यांनी दि.२७.०३.२०२२ च्या आदेशान्वये मंजूरी प्रदान केली आहे.

२. सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 365 **/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 18/ 05 /2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शासन निर्णय क्र. नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६, दि. ०१.०४.२००९ व शासन निर्णय क्रमांक नामपा - २३०८ - ६८० - प्र.क्र. - ३५८ - नवि - २६ दिनांक ०८.०९.२०१० अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमश: नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी २००९ व दुरूस्ती उपविधी २०१० च्या कलम ५६(ब) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी वर्ष २०२३ - २४ करिता सद्यस्थित प्रचलित दरात ५% वाढ करण्यास दि. २७.०३.२०२३ अन्वये मंजुरी प्रदान केलेल्या व दिनांक ०१.०४.२०२३ पासून लागू केलेल्या सुधारित दरांची माहितीची नोंद घेण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**